# सायबर शिक्षा पुरस्काराचे आयोजन

**मुंबई :** क्विक हिल फाऊंडेशन या जागतिक सायबर सुरक्षा सोल्यूशन्स प्रदाता क्विक हिल टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या सीएसआर शाखेने सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा पुरस्कारच्या २०२४ पर्वाचे आयोजन केले. या समारोहामध्ये शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्रयत्नांना प्रशंसित करण्यात आले, ज्यांनी त्यांचा प्रमुख उपक्रम सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षामध्ये सहभाग घेतला. क्विक हिल फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, जळगाव येथील कवियत्री बहिणाबाई चौधरी नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. व्ही. एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळ्कर सोलापूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. (डॉ.) प्रकाश ए. महानवार, महाराष्ट्र सायबरचे पोलीस अधीक्षक संजय शिंत्रे आणि २९ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांनी उपस्थिती दाखवून या पुरस्कार समारोहाची शोभा वाढवली.